धुराड्याच्या आत

मराठी: अश्विनी बर्वे

एके काळी दोन मुली त्यांच्या आई-वडिलांसोबत राहत होत्या.

त्या कुटुंबाने आपले पैसे एका लांब बंदाच्या पिशवीत ठेवले होते, पण ती पिशवी चोरीला गेली आणि त्यांच्या वडिलांजवळ काही काम नव्हते, म्हणून त्या मुलींना आपले नशीब आजमावण्यासाठी बाहेर जायचे होते.

आता एका मुलीला गावात काम शोधायचे होते आणि तिच्या आईने सांगितले की, जर तिला नोकरी मिळाली तर ती तिथेच राहू शकेल.



ती मुलगी शहराकडे निघाली. ती शहरात सगळीकडे फिरली, पण कोणीही तिला कामावर ठेवायला तयार नव्हते.



ती कामाच्या शोधात पुढे जात राहिली.

आणि ती अशा ठिकाणी आली जिथे भट्टीत पाव भाजला जात होता. पाव म्हणाला, "बाळा, आम्हाला भट्टीतून बाहेर काढ. आम्हाला भाजायला ठेवून सात वर्षे झाली आहेत आणि आम्हाला बाहेर काढायला कोणीही आले नाही."

म्हणून त्या मुलीने भट्टीतून पाव बाहेर काढला, जमिनीवर ठेवला आणि ती आपल्या वाटेने निघून गेली.

मग तिला एक गाय भेटली आणि ती गाय म्हणाली, "बेटा, माझं दूध काढ, माझं दूध काढ! मी सात वर्षांपासून वाट बघत आहे आणि माझं दूध काढायला कोणीच आलं नाही."

म्हणून त्या मुलीने तिथे ठेवलेल्या बादल्यांमध्ये गायीचे दूध काढले.

ती भुकेली असल्याने तिने थोडे दूध प्यायले आणि बाकीचे बादल्यांमध्येच सोडून दिले.



मग ती थोडी पुढे गेली आणि एका सफरचंदाच्या झाडाजवळ आली, ते इतक्या सफरचंदांनी लगडले होते की त्याच्या फांद्या वाकल्या होत्या. ते झाड तिला म्हणाले, “बाळा, मला हलव आणि सगळी सफरचंदं खाली पाड. माझ्या फांद्या मोडत आहेत, त्या खूप जड झाल्या आहेत.”

आणि ती मुलगी म्हणाली, “नक्कीच, मी ते करीन.”

म्हणून त्याने ते झाड जोरात हलवले आणि सर्व फळे खाली पडली.



आणि ती मुलगी झाडाच्या फांद्यांखाली वाकली आणि तिने सर्व सफरचंद जमिनीवर टाकली.

मग ती पुढे चालत राहिली
आणि एका घरापाशी पोहोचली.

त्या घरात एक चेटकीण राहत असे आणि ती तरुण मुलींना नोकर म्हणून ठेवत असे. जेव्हा तिला कळले की ती मुलगी कामाच्या शोधात घर सोडून आली आहे, तेव्हा तिने तिला नोकरी देण्याचे आणि चांगला पगार देण्याचे वचन दिले.

जादुगारणीने मुलीला तिला कोणती कामे करावी लागतील हे समजावून सांगितले. "तू घर स्वच्छ ठेव, फरशी झाड. पण एका गोष्टीची खूप काळजी घे. चिमणीतून कधीही खाली पाहू नकोस, नाहीतर तुझ्यासोबत काहीतरी वाईट घडू शकते."

मुलीने सांगितल्याप्रमाणे करण्याचे वचन दिले. पण एके दिवशी, जेव्हा चेटकीण बाहेर गेली होती आणि ती साफसफाई करत होती , तेव्हा चेटकिणीने तिला ज्या गोष्टीबद्दल सावध केले होते, ती गोष्ट विसरली. तिने चिमणीतून खाली पाहिले. तिने खाली पाहताच, पैशांनी भरलेली एक मोठी पिशवी तिच्या मांडीवर पडली. तिला तिच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. तिने ती पिशवी काळजीपूर्वक पाहिली.

“ही पिशवी मी ओळखते,” ती म्हणाली, “ही माझ्या आई-वडिलांची आहे.”

पिशवी घेऊन ती घराच्या दिशेने चालू लागली.

पण ती थोड्या अंतरावर गेल्यावर, तिला
चेटकीण तिच्या मागे येत असल्याचे ऐकू आले.

ती सफरचंदाच्या झाडाजवळ धावत आली आणि ओरडली:

सफरचंदाच्या झाडा, सफरचंदाच्या झाडा, मला पटकन कुठेतरी लपव

त्या म्हाताऱ्या चेटकिणीला मी सापडायला नको, कारण

जर तिला मी सापडले, तर ती माझे तुकडे तुकडे करेल.

आणि ती दुष्ट स्त्री मला दगडांखाली पुरेल.

म्हणून मग सफरचंदाच्या झाडाने तिला लपवले.

जादुगारिणी झाडाजवळ आली आणि म्हणाली:

अरे माझ्या झाडा, अरे माझ्या झाडा,

तू त्या लहान मुलीला पाहिलं का?

तिने माझे सर्व पैसे चोरले आहेत.

आणि सफरचंदाचे झाड म्हणाले, “नाही बाई, मी तुला सात वर्षांपासून पाहिले नाही.”

जेव्हा चेटकीण दुसऱ्या दिशेने गेली, तेव्हा ती मुलगी तेथून पळून गेली.

ती गाईजवळ पोहोचताच, तिला चेटकिणीचा पुन्हा येण्याचा आवाज आला. ती गाईकडे धावत गेली आणि म्हणाली:

गायी, गायी, मला पटकन कुठेतरी लपव.

त्या म्हाताऱ्या चेटकिणीला मी सापडायला नको.

जर तिला मी सापडले, तर ती माझी हाडे तोडून टाकेल.

आणि ती दुष्ट स्त्री मला दगडांखाली पुरेल.

म्हणून गाईने ते लपवले.

जेव्हा चेटकीण आली, तेव्हा तिने आजूबाजूला शोध घेतला आणि गाईला म्हणाली:

माझी गाय, माझी गाय

तू त्या लहान मुलीला पाहिलं का?

तिने माझे सर्व पैसे चोरले आहेत.

तेव्हा गाय म्हणाली, “नाही बाई, मी तुला सात वर्षांपासून पाहिले नाही.”

जेव्हा चेटकीण दुसऱ्या दिशेने गेली, तेव्हा ती मुलगी पुन्हा पळून गेली. ती भट्टीजवळ पोहोचताच, तिला चेटकीण पुन्हा आपला पाठलाग करत असल्याचा आवाज आला. ती भट्टीकडे धावत गेली आणि म्हणाली:

भट्टी भट्टी, मला पटकन कुठेतरी लपव.

त्या म्हाताऱ्या चेटकिणीला मी सापडायला नको. कारण

जर तिला मी सापडले, तर ती माझी हाडे तोडून टाकेल.

आणि ती दुष्ट स्त्री मला दगडांखाली पुरेल.

आणि भट्टी म्हणाली, “माझ्याकडे जागा नाही. तू भट्टीवाल्याला विचार." भट्टीवाल्याने तिला भट्टीच्या मागे लपवले.

जेव्हा चेटकीण आली, तेव्हा तिने सर्वत्र शोधले आणि मग भट्टीवाल्याला म्हणाली:

भट्टीवाल्या भट्टीवाल्या तू त्या लहान मुलीला पाहिलं का?

तिने माझे सर्व पैसे चोरले आहेत.

तेव्हा भट्टीवाला म्हणाला, "भट्टीमध्ये बघ." मग ती म्हातारी चेटकीण भट्टीजवळ आली आणि भट्टी म्हणाली, "आत ये आणि सगळ्यात दूरच्या कोपऱ्यात बघ."

चेटकीण भट्टीमध्ये गेली आणि ती आत खोलवर गेल्यावर भट्टीवाल्याने दार बंद केले आणि ती बराच वेळ ती तिथेच अडकून राहिली.



ती मुलगी पुन्हा प्रवासाला निघाली आणि अखेरीस चेटकिणीने चोरलेली पैशांनी भरलेली पिशवी घेऊन घरी पोहोचली.

तिने ती लांब बंदांची पिशवी आपल्या आई-वडिलांना दिली, एका चांगल्या तरुणाशी लग्न केले आणि पुढे ती सुखाने नांदली.

आता दुसऱ्या मुलीने विचार केला की ती सुद्धा घराबाहेर जाऊन तसेच करेल.

ती त्या दिशेने गेली. पण जेव्हा ती भट्टीजवळ पोहोचली, तेव्हा पाव म्हणाला, "बाळा, आम्हाला भट्टीतून बाहेर काढ. आम्ही सात वर्षांपासून भाजले जात आहोत, आणि आम्हाला बाहेर काढायला कोणीही आले नाही."

पण ती मुलगी म्हणाली, “नाही, मला माझी बोटं जाळायची नाहीत.”

म्हणून ती पुढे जात राहिली आणि तिला गाय भेटली. गाय म्हणाली, "बाळ, माझं दूध काढ, माझं दूध काढ! मी सात वर्षांपासून वाट पाहत आहे आणि माझं दूध काढायला कोणीच आलं नाही."

पण ती मुलगी म्हणाली, “नाही, मी तुझं दूध काढू शकत नाही, मला घाई आहे,” आणि पटकन निघून गेली.

मग ती सफरचंदाच्या झाडाजवळ गेली आणि झाडाने तिला ते हलवून सर्व फळे खाली पाडायला सांगितले.

"नाही, मला जमणार नाही," ती म्हणाली. "दुसऱ्या दिवशी कदाचित मी करेन."

आणि ती चेटकिणीच्या घरापर्यंत पोहोचेपर्यंत चालत राहिली.

पहिल्या मुलीप्रमाणेच चेटकिणीने तिलाही कामावर ठेवले. एके दिवशी, जेव्हा चेटकीण बाहेर गेली होती, तेव्हा तिने तिला काय सांगितले होते हे ती विसरली. तिने चिमणीत खाली पाहिले आणि पैशांनी भरलेली एक पिशवी खाली पडली. तिने ती पिशवी घेऊन लगेच निघून जायचे ठरवले.

जेव्हा ती सफरचंदाच्या झाडाजवळ पोहोचली, तेव्हा तिला तिच्या मागे चेटकिणीचा आवाज आला. ती ओरडली:

सफरचंदाच्या झाडा सफरचंदाच्या झाडा, मला पटकन कुठेतरी लपव.

त्या म्हाताऱ्या चेटकिणीला मी सापडायला नको. कारण
जर तिला मी सापडले, तर ती माझी हाडे तोडून टाकेल.
आणि ती दुष्ट स्त्री मला दगडांखाली पुरेल.

पण झाडाने उत्तर दिले नाही. थोड्याच वेळात चेटकीण आली आणि झाडाला म्हणाली:

अरे माझ्या झाडा, अरे माझ्या झाडा,
तू त्या लहान मुलीला पाहिलं का?
तिच्या हातात लांब पिशवी आहे.
तिने माझे सर्व पैसे चोरले आहेत.

झाड म्हणाले, “हो, आई, ती त्या वाटेने गेली.”

म्हणून ती म्हातारी चेटकीण त्या मुलीच्या मागे धावली आणि तिने तिला पकडले. तिने तिच्याकडून सर्व पैसे हिसकावून घेतले, तिला झाडूने बेदम मारले आणि त्याच अवस्थेत तिला घरी पाठवून दिले.

समाप्त